# पिंपळ

निसर्ग म्हणजे हिरव्या रत्नांचा खजिना! छोटी, मोठी असंख्य झाडं ह्या पृथ्वीला सुंदर बनवतात, आणि इथल्या सजीवांना अन्न, वस्त्र, प्राणवायू पुरवून जीवन देतात.. "प्रत्येक हिरवं पान आपल्याला प्राणवायू देत असतं," हे जेव्हा लहानपणी कळलं, मनात रुजलं, तेव्हापासून मला झाडांविषयी आदर आहे, प्रेम आहे! सगळीच झाडं मला आवडतात. काहींचे खोड चांगले असते, तर काहींचा डोलारा! काहींची पाने आकर्षित करतात, तर काहींची फुले! काही झाडांचे गुणधर्म, तर काहींचे उपयोग! त्यातलं एक निवडा, असे म्हटले तर ते खूपच कठीण आहे.

पण तरी विचारले, तर मी सांगेन... मला आवडलेले झाड म्हणजे पिंपळ!



ह्या झाडाचा सगळ्यांत आकर्षित करणारा भाग, म्हणजे ह्या झाडाची पानं! झाडाच्या बालपणात, तारुण्यात, प्रौढपणात, पानं गळल्यानंतर, प्रत्येक अवस्थेत ही पानं खूपच सुंदर दिसतात!

झाडाला नवीन पालवी येते, तेव्हा ती इतकी गुलाबी, लालचुटूक दिसते, की ती पाहून मला नवजात बालकाच्या, नाजूक पावलांची, गोबऱ्या गालांची आठवण होते.





नवीन पानं येतांना, झाड त्यांची किती काळजी घेते!

एकदा गार्डनमध्ये मला खाली हिरव्या गुंडाळी सारखा भाग दिसला.. कळेना.. हे काय आहे? नीट पाहिले असतां दिसलं, की पालवी येतांना, त्यांचे रक्षण करायला, ही टोपी त्यावर असते. पान थोडे मोठे होतांना, ती गुंडाळी खाली पडते! हे झाडाचे ममत्व पाहून, मी तर भारावून गेले!

ह्या पानांत कोण रंग भरतं?... लहानपणी गोष्टीत वनदेवता असायची, जलपरी, वास देणारी परी, अशा पऱ्या असायच्या! पानांना रंग देणारी पण अशीच सुरेख परी असली पाहिजे! लाल पानांत ती हळुवार पोपटी, हिरवा, गडद हिरवा असे रंग भरत असेल! अशी पानं पाहिली की मला त्यांचे किती फोटो काढू, असं होऊन जातं!







ह्या पानांचा आकार सुध्दा किती आपल्या जवळचा... आपल्या हृदयासारखा... आणि सगळी पानं, त्यांचे पुढचे लांब टोक, जमिनीच्या दिशेने झुकवून, जणू भूमातेला नमस्कार करताहेत, अशा नम्र भावनेने, प्रसन्न चेहऱ्याने वावरणारी!

निसर्गाची सुध्दा कमाल आहे नाही? झाडांवर इतकी हजारो पानं असतात, पण त्यांची झाडावर अशी रचना केलेली असते, की झाडावरच्या प्रत्येक पानाला, पुरेसा सूर्यप्रकाश मिळेल!
वारा आला की, ही पानं टाळ्या वाजवताहेत, आनंदाने नाचताहेत, असेच वाटते, कारण त्यांच्या लांब देठामुळे ती छान, सतत हलत असतात. उत्साहाने सळसळत असतात. काही जण, गावातल्या शांत वातावरणात, ह्या आवाजाला घाबरतात ! पिंपळावर मुंजा असतो, भूत असते, असा उगीच गैरसमज, तिथल्या लोकांच्यात असतो.

वयात आलेली पोपटी, हिरवी पानं, अगदी पाचूच्या, लोलकासारखी, झुंबरासारखी, रस्त्यावरून जाणाऱ्यांचे लक्ष वेधून घेत असतात.

वसंत ऋतु यायच्या आधी, पिंपळाच्या झाडाची सर्व पानं गळून जातात. दिसतात उघड्या फांद्या.. वाटतं झाड आपले हात, आणि बोटं उंच करून आकाशाला कवेत घ्यायचा प्रयत्न करत आहे.

ह्या झाडाची मुळं खोलवर, लांब जातात. हा वृक्ष, ५/६ मजल्याच्या इमारतीइतका ऊंच वाढतो, आणि फांद्याही पसरल्यामुळे जागा व्यापतो. त्यामुळे नको तिथे वाढलेला वृक्ष त्रासदायक होऊ शकतो. पिंपळाच्या फांद्या कधी कधी खालच्या बाजूला वळतात, जमिनीत जातात. त्याला मुळंही येतात!

पिंपळ खूप वर्ष जगतो म्हणून त्याला अक्षय, किंवा अश्वस्थ म्हणतात. श्रीलंकेत २००० वर्षांपूर्वीचा पिंपळ अजून आहे.
गौतमबुध्दांनी बिहारमधील बोधगया येथील पिंपळाच्या वृक्षाखाली बसून ध्यान केले व त्यांना ज्ञानप्राप्ती झाली म्हणून ह्या वृक्षाला पवित्र मानतात. त्याला बोधी वृक्ष म्हणतात.

भारतीय संस्कृतीत पिंपळाला खूप महत्व आहे. हिंदू, जैन, बुध्द ह्या वृक्षाला खूप पवित्र मानतात. पिंपळ मूळचा भारतातलाच! पुष्य नक्षत्राचा तो आराध्य वृक्ष आहे.

ह्या वृक्षाचा प्रत्येक भाग उपयोगी आहे. म्हणून पिंपळाला कल्पवृक्ष समजतात.
पिंपळाच्या खोडापासून, होड्या, आगपेट्या करतात, लाख बनवतात.

पिंपळ बुध्दीवर्धक, शक्तिवर्धक, रक्तशुध्दीकारक, रोगनाशक आहे. पोटाच्या विकारापासून, दम्यासारख्या असाध्य विकारांमध्ये हा वृक्ष गुणकारी आहे.

आळंदीला श्री. ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीजवळ एक जुना पिंपळ वृक्ष आहे. त्याला सुवर्ण पिंपळ म्हणतात. ज्ञानेश्वर महाराजांच्या मातोश्रींनी ह्या वृक्षाला सव्वा लाख प्रदक्षिणा घातल्या होत्या. म्हणून ह्या वृक्षाचे दर्शन पवित्र समजले जाते.

असा हा पिंपळ! मी ह्या पवित्र वृक्षाला वंदन करते.

**- चित्रा मेहेंदळे**